# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.08.2025** **वार-सोमवार**

---

**पाऊस**

पुणे शहर, उपनगर आणि जिल्ह्याच्या काही भागातही आज सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. जोरदार पावसामुळे शहरातील अनेक रस्ते जलमय झाले असून प्रमुख रस्त्यांवर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. उद्याही पुणे शहर परिसरात मुसळधार पावसाची शक्यता असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**धरणसाठा**

दरम्यान या पावसामुळे पुणे शहर आणि जिल्ह्यातील धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. निरा देवघर धरण ९८ टक्क्यांपेक्षा जास्त भरलं असून धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे. खडकवासला धरण साखळीतही आज सकाळी सहा वाजेपर्यंत 90 टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा झाला आहे.

**नारदपुरस्कार**

विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी देण्यात येणाऱ्या आद्य पत्रकार देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. संजय तांबट यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह आनंद काटीकर यांनी पत्रकार परीषदेत ही माहिती दिली. छायाचित्रकार प्रशांत खरोटे, बातमीदार सतीश वैजापूरकर, समाज माध्यमावरील प्रभावशाली व्यक्तिमत्व मुक्ता चैतन्य आणि आरजे शोनाली यांनाही पुरस्कार जाहीर झाले आहेत. ज्येष्ठ पत्रकार, लेखक, वक्ते प्रफुल्ल केतकर यांच्या हस्ते येत्या शुक्रवारी या पुरस्कारांचं वितरण होणार आहे. यावेळी 'राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रसार माध्यमे' या विषयावर केतकर यांचं व्याख्यान होणार आहे.

**<u>अभिवादन</u>**

थोरले बाजीराव पेशवे यांच्या ३२५व्या जयंतीनिमित्त आज पुण्यात इतिहास प्रेमी मंडळ आणि बाजीराव पेशवे प्रतिष्ठाननं त्यांना मानवंदना आरोन केली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष मोहन शेटे यांनी रणधुरंधर बाजीराव पेशवे या विषयावर कथाकथन केलं.

**<u>राष्ट्रीय आरोग्य अभियान</u>**

आपल्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीने उद्यापासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. वारंवार विनंती करूनही राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केलं जात असल्यानं हा संप पुकारत असल्याचं समितीनं म्हटलं आहे.

**<u>ई-फार्मसीबंदी</u>**

औषधांची बेकायदा ऑनलाइन विक्री करणाऱ्या ई-फार्मसी कंपन्यांवर त्वरित बंदी घालावी, अशी मागणी अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेनं केली आहे. या मागणीला पुणे केमिस्ट असोसिएशनने पाठिंबा दिला आहे. ऑनलाइन विक्रीद्वारे चुकीची औषधे आली, तर त्याचा मोठा दुष्परिणाम होईल, असं पुणे केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अनिल बेलकर यांनी म्हटलं आहे.

**<u>अमलीपदार्थ</u>**

पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने १३ ते १७ ऑगस्ट या कालावधीत अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम राबवली. यामध्ये हडपसर भागातील शाळा आणि महाविद्यालयात पथनाट्य आणि कार्यशाळांच्या माध्यमातून अमली पदार्थांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली.

**<u>गणेशमंडळांचागौरव</u>**

मानसिक दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या पुण्यातील सेवासदन दिलासा कार्यशाळेच्या वतीने सुरू असलेल्या गणपती विक्री उपक्रमाला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहे. यानिमित्त, सामाजिक कार्य करणाऱ्या २५ गणेश मंडळांचा आज पुण्यात विशेष सन्मान करण्यात आला. ढोल ताशा महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर यांच्या हस्ते या मंडळांना गौरवण्यात आलं.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महानगरपालिका कर्मचारी भरतीबाबत पसरवल्या जात असलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहन पुणे महापालिकेच्या वतीने करण्यात आलं आहे. पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून विविध पदांच्या भरती प्रक्रियेसाठी वेळोवेळी स्थानिक वर्तमानपत्रात सविस्तर जाहिरात देऊन तसंच महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येतात, आणि पारदर्शकरित्या पदभरतीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येते असं महापालिकेनं स्पष्ट केलं आहे.

**<u>pcmc</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा वैद्यकीय विभाग आणि इंडियन मेडिकल असोसिएशननं सांगवीच्या इंदिरा गांधी रुग्णालयात आज महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी शिबिर आयोजित केलं होतं. या शिबिरात ७०हून अधिक महिलांची तपासणी करण्यात आली. आगामी काळात महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये अशी शिबीरं घेणार असल्याचं वैद्यकीय विभागातर्फे सांगण्यात आलं आहे.

**<u>प्रकाशन</u>**

जागतिक स्तरावरील ज्ञान आत्मसाद करतानाच आपली संस्कृती आणि परंपराही जपायला हवी, असं प्रतिपादन लोककलेचे अभ्यासक डॉ. भावार्थ देखणे यांनी नुकतंच पुण्यात केलं. हरीश पाचंगे लिखित, 'गोंधळ एक कुलाचार' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. गिरीश प्रभुणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार**